

देगलूर : विद्यापीठीय बॉलबॅडमिंटन स्पर्धा देगलूरमध्ये उत्साहात पार पडल्या.

# विद्यापीठीय बॉलबॅडमिंटन स्पर्धा देगलूरमध्यें उत्साहात

देगलूर, ता.२ (बातमीदार) : देगलूर महाविद्यालय देगलूर येथे संपन्न झालेल्या अंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन स्पर्धेत मुलींच्या गटात महात्मा फुले महाविद्यालय किनगावने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक धुंडामहाराज महाविद्यालय देगलूर, तृतीय क्रमांक देगलूर महाविद्यालय देगलूर तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक महात्मा फुले महाविद्यालय किनगाव, द्वितीय क्रमांक महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर, तृतीय क्रमांक देगलूर महाविद्यालय देगलूरने बाजी मारली.

यावेळी श्री नारायण आण्णा उपलंचवार यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. निरजकुमार उपलंचवार व प्रा. सिताराम हाके, प्रा.दिपक वावधाने, धुंडामहाराज देगलूरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलिप भडके यांनी स्पर्धेचे नियोजन केले. विजयी संघाचे अड्डत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य चमकुडे एम.एम., प्रा. संग्राम पाटील, गोविंद जोशी यांच्या सहशिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner